|| Vidya Vinyen Shobhate ||

*Pankaj Shaikshanik & Samajik Sanstha Sanchalit*

R.No. Maha/1383/Jalgaon/F 1288 Jalgaon. Dt.1/2/91

# Pankaj Kala Mahavidyalaya,Chopda

**Ph.Office : (02586) 222514** 'B' Grade NAAC Accredited **Prof. Dr. Rajendra R. Attarde**

E-mail :pankajcollege@gmail.com M.Sc. Ph.D.

rrattarde@gmail.com **UGC 2(f) &12 (B) Recognized** **Mob. : 9421885331**

**Website :**www.pankajcollege.co.in **K.B.C.N.M.U PERMANENT AFFILIATION**

**Borole Nagar No.2, Yawal Road, Chopda-425107 Dist. Jalgaon.**

**1.1.1: The Institution ensures effective curriculum planning and delivery through a well-planned and documented process including Academic calendar and conduct of continuous internal Assessment.**

**Response:**

**Kindly refer to the supportive documents attached herewith**

| Sr.No | List of Documents | Page No/File |
|---|---|---|
| 1 | ACADEMIC CALENDAR 2017-18 | PDF |
| 2 | ACADEMIC CALENDAR 2018-19 | PDF |
| 3 | ACADEMIC CALENDAR 2019-20 | PDF |
| 4 | ACADEMIC CALENDAR 2020-21 | PDF |
| 5 | ACADEMIC CALENDAR 2021-22 | PDF |
| 6. | DEPARTMENTAL ACADEMIC CALENDAR 2017-18 | PDF |
| 7 | DEPARTMENTAL ACADEMIC CALENDAR 2018-19 | PDF |
| 8 | DEPARTMENTAL ACADEMIC CALENDAR 2019-20 | PDF |
| 9 | DEPARTMENTAL ACADEMIC CALENDAR 2020-21 | PDF |
| 10 | DEPARTMENTAL ACADEMIC CALENDAR 2021-22 | PDF |

| | | |
|---|---|---|
| **11** | **Master Time Table and Departmental Time Table 2017-18** | PDF |
| **12** | **Master Time Table and Departmental Time Table 2018-19** | PDF |
| **13** | **Master Time Table and Departmental Time Table 2019-20** | PDF |
| **14** | **Master Time Table and Departmental Time Table 2020-21** | PDF |
| **15** | **Master Time Table and Departmental Time Table 2021-22** | PDF |
| **16** | **Teaching Plan 2017-18** | PDF |
| **17** | **Teaching Plan 2018-19** | PDF |
| **18** | **Teaching Plan 2019-20** | PDF |
| **19** | **Teaching Plan 2020-21** | PDF |
| **20** | **Teaching Plan 2021-22** | PDF |
| **21** | **Teaching Diary Sample (2017-2022)** | PDF |
| **22** | **Continuous Internal Evaluation, Examination Policy and Minutes of Meeting** | PDF |
| **22** | **Certificates of Faculty Participation in Syllabus Framing Workshops during last five years** | PDF |

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon)

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/३९१/२०२१ दि.१० फेब्रुवारी, २०२१

प्रति,

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

२) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील हिवाळी (Nov./Dec.2020) परीक्षांचे आयोजन करणेबाबत.

**संदर्भ :-** (१) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.KBCNMU/८/Academic Calender/२९५/२०२० दि.३ नोव्हेंबर,२०२० अन्वये प्रसिध्द शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे Academic Calender.
(२) विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/७अ/२९४/२०२१, दि.२९/०१/२०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नियमित सत्र-१ च्या पदवी व पदविका स्तरावरील प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान,प्रथम वर्ष समाजकार्य(B.S.W.),पदवीस्तरावरील व्यवस्थापनशास्त्राचे अभ्यासकम,डी.पी.ए., बी.ए.एम.सी.जे., बी.पी.ई. , बी.व्होक या अभ्यासक्रमांच्या परीक्षा संदर्भांकित (१) अन्वये प्रसिध्द सन २०२०-२१ च्या शैक्षणिक दिनदर्शिकेत नमूद केल्यानुसार दि.०२ मार्च,२०२१ पासून आयोजित करण्यात येणार आहेत.

तसेच विधी अभ्यासक्रमाच्या एल.एल.बी., आणि एल.एल.एम. च्या सत्र १ वगळता इतर परीक्षा विद्यापीठाचे संदर्भांकित (२) वर नमूद दि.२९/०१/२०२१ च्या पत्रान्वये **अ)** मध्ये कळविण्यात आल्यानुसार दि.०२ मार्च,२०२१ पासून आयोजित करण्यात येणार आहेत.

वरील अभ्यासक्रमांच्या परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.:-

(१) दि.०२ मार्च, २०२१ पासून घेण्यात येतील.

(२) **मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्य केल्याप्रमाणे परीक्षेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.:-**

- परीक्षांसाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरुप **वस्तुनिष्ठ बहुपर्यायी** Multiple Choice Question **M.C.Q. स्वरुपात Online पध्दतीने Smart Phone/ Laptop/Desktop with Web camera** याद्वारे घेण्यात येतील व परीक्षेसाठी एकूण गुण पॅटर्ननुसार राहतील.
- परीक्षेचा कालावधी पदवीस्तरावरील परीक्षेसाठी ९० मिनिटे व पदव्युत्तर स्तरावरील १२० मिनिटे असेल.

(१७) या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता, दि.२ मार्च,२०२१ पासून विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण तसेच मार्गदर्शन करण्यासंदर्भात व कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, या संदर्भात सर्वतोपरी सहकार्य करण्याबाबत महाविद्यालयामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या Co-ordinator यांना मा.प्राचार्यांनी सूचना द्याव्यात.

(१८) वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या /बहुपर्यायी Multiple Choice Question (MCQ) परीक्षांसाठी फोटोकॉपी व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध होणार नाही.

(१९) सर्व संलग्नित महाविद्यालयांनी परीक्षेबाबत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी परिपत्रकाद्वारे महाविद्यालयाचे संकेतस्थळ, सूचना फलक , सोशल मिडीया, ऑनलाईन माध्यमातून प्रयत्न करावा.

(२०) विद्यापीठाचे विविध परिपत्रकांन्वये परीक्षा आयोजनाबाबत कळविण्यात आलेल्या सुचना व नियमांचे तंतोतंत पालन करुन परीक्षा कॉपी विरहित वातावरणात पार पाडाव्यात.

सदर बाब विद्यार्थी व सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून देऊन परीक्षा सुरळितपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,



( भ. प्र. पाटील )
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव अग्रेषित-**

१) मा.कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) मा.प्र-कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) मा.प्र-कुलसचिव कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४)मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव-**

१) उपकुलसचिव,परीक्षा व मूल्यमापन मंडळ(विज्ञान व तंत्रज्ञान,परीक्षा गैरप्रकार चौकशी,रेकॉर्ड व पदवीप्रदान),क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) यंत्रणा विश्लेषक,संगणक केंद्र,परीक्षा व मूल्यमापन विभाग, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) प्र.सहायक कुलसचिव,(गोपनीय पूर्वार्ध) परीक्षा व मूल्यमापन मंडळ ,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४) विशेष कार्य अधिकारी (संगणक केंद्र),परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
५) परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
६) समन्वयक, एम.के.सी.एल., कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र. उमवि/7-अ/अंतर्गत मूल्यमापन गुण/202/2021 दिनांक :19/01/2021

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक व विभागप्रमुख,
कबचौउमविशी संलग्नीत सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था
आणि कबचौउमवि परिसरातील सर्व शैक्षणिक प्रशाळा/विभाग

**विषय**: शैक्षणिक वर्ष 2020-21 मधील हिवाळी परीक्षेकरीता (**नियमित विद्यार्थ्यांसाठी**) **अंतर्गत मुल्यमापनाचे गुण** विद्यापीठास सादर करणेबाबत.......

**संदर्भ** :1) विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/7-अ/4088/2020, दिनांक 03.12.2020.
2) विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/7-अ/3095/2020, दिनांक 17.11.2020.

महोदय/महोदया,

आपणास विदीतच आहे की, विद्यापीठामार्फत शैक्षणिक वर्ष 2020-21 मधील हिवाळी परीक्षांचे आयोजन करण्यात आले असून, दिनांक 19.01.2021 पासून विविध अभ्यासक्रमांच्या पदवी स्तरावरील सत्र 1 चे बॅकलॉग व सत्र 3 व 5 चे नियमित/ बॅकलॉग विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु होत असून, पदव्युत्तर वर्गांच्या परीक्षा दिनांक 23.01.2021 पासून सुरु होत आहेत.

विद्यापीठाच्या संदर्भिय पत्र क्र. 01 नुसार अंतर्गत मुल्यमापनाचे गुण, बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण, सदर पत्रात नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन दिनांक 31.12.2020 पर्यंत विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या Online ADES Software व्दारे Online जमा करणेबाबत सूचित करण्यात आले आहे. (संदर्भिय पत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून, कृपया सदर पत्राचे अवलोकन करावे.)

उपरोक्त अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये प्रवेशित झालेल्या नियमित विद्यार्थ्यांच्या अंतर्गत परीक्षांचे मुल्यमापन करणेबाबत महाविद्यालयास विद्यापीठाच्या संदर्भिय पत्र क्र. 02 नुसार कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने, उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष 2020-21 मधील प्रवेशित नियमित विद्यार्थ्यांचे अंतर्गत मुल्यमापन गुण विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागात विहीत कालावधीत जमा करावयाचे असून, त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती वापरावी:-

1) अंतर्गत मुल्यमापनाचे गुण विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी महाविद्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावेत. विद्यार्थी, ज्या त्रुट्या निदर्शनास आणून देतील, त्यांचे निराकरण महाविद्यालयीन स्तरावर करण्यात यावे.

2) वरील सर्व त्रृटींचे निराकरण झाल्यानंतर एम.के.सी.एल.ने विकसीत केलेल्या ॲसेसमेंट डेटा एन्ट्री सॉफ्टवेअर (ADES) व्दारे अंतर्गत गुणांची नोंदणी करावयाची आहे. या करीता प्रथम वर्षासाठी जी कार्यपध्दती ठरवून दिली आहे त्या प्रमाणे कामकाज करावे.

9) **विद्यापीठाच्या 60:40 पॅटर्ननुसार लेखी व अंतर्गत परीक्षेचे स्वतंत्र हेड ऑफ पासिंग आहे. त्यामुळे 60:40 पॅटर्नमधील अभ्यासक्रमाच्या सर्व सत्रांच्या अंतर्गत परीक्षा लेखी परीक्षेप्रमाणे प्रत्येक सत्रामध्ये आयोजित करून (नियमित) अंतर्गत परीक्षेचे गुण विद्यापीठात सादर करावेत.**

10) मा.परीक्षा मंडळ ठराव क्र. 51/2014 दि. 19/05/2014 अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरलेला नसेल, अशा विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करता येणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

**अ)** द्वितीय वर्ष विज्ञान (सत्र पध्दत, Marking Scheme) तसेच द्वितीय वर्ष कला व वाणिज्य (80+20 Pattern) च्या ज्या विद्यार्थ्यांनी शै.वर्ष 2020-21 मध्ये तृतीय वर्षास प्रवेश घेतला आहे त्यांचे अंतर्गत गुण खालील नमुन्यात Mannualy सादर करावेत .

**ब)** द्वितीय व तृतीय वर्ष विज्ञान (सत्र पध्दत, Marking Scheme) तसेच तृतीय वर्ष कला,वाणिज्य (80+20 Pattern) मधील Repeater विद्यार्थ्याचे गुणपत्रक खालील नमुन्यात Mannualy स्वतंत्र पणे सादर करावेत.

**गुणयाद्या पाठविण्याचा नमुना**

**Internal marks for the examination WINTER EXAM-2020**

Name of College :

Class : Pattern : Subject Code: Subject Name :

| Sr No. | Seat No. | Name of Student | Internal Marks Obtained out of _____ |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

वर नमुद केल्याप्रमाणे अंतर्गत मुल्यमापनाचे गुण वरील कार्यप्रणाली अवलंबून खाली नमुद केलेल्या तारखांना Online जमा करावे.

| **अ.क्र.** | **तपशिल (शैक्षणिक वर्ष 2020-21 मधील सत्र-1 चे नियमित विद्यार्थी वगळून)** | **अंतर्गत (Internal) मुल्यमापनाचे गुण Online सादर करावयाची तारीख** |
|---|---|---|
| 1. | S.Y./ T.Y. B.A, B.Com, B.Sc.,BSW, B.VOC (OLD), DPA, B.A.(Music) Additional, B.A. (MCJ) | **05.02.2021** |
| 2. | BBA, BMS (BBM-BBS) BMS (BBM e-Com), BCA, BBA (Integrated) | **05.02.2021** |
| 3. | MA, M Com, MSW, MCJ. | **05.02.2021** |
| 4. | M Sc, MCA, MCJ, Integrated MCA | **05.02.2021** |
| 5. | MMS (MBM (Comp. & Perso Mgmt.), MBA, Dual Degree MBA | **05.02.2021** |
| 6. | BPE | **05.02.2021** |
| 7. | B.VOC (NEW) | **05.02.2021** |

विद्यापीठाच्या संदर्भिय पत्र क्र.02 अन्वये बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मुल्यमापनाचे गुण सादर करणेबाबत नमूद केलेली मुदत वाढविण्यात येत असून, त्यानुसार सदरचे **अंतर्गत मुल्यमापनाचे गुण दिनांक 05.02.2021 पर्यंत विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या Online ADES Software व्दारे Online जमा करावेत.**

**<u>महत्वाची सूचना:-</u>**

अंतर्गत गुण हे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणे अत्यावश्यक असून त्यांनी सूचविलेल्या त्रुटींचे निराकरण आपल्या स्तरावर केल्यानंतरच अंतर्गत गुण Online Export / विद्यापीठात जमा करावेत. सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व विषयांच्या अंतर्गत गुणांची नोंद संगणकात अचूक पध्दतीने Online घेणे आवश्यक आहे. ज्या गुणांची नोंद संगणकात होणार नाही, त्या विद्यार्थ्यांच्या गुणांनी नोंद परिशिष्ठ मध्ये करण्यात यावी व हे गुण स्वतंत्र फाईल मध्ये विद्यापीठात जमा करावेत. तद्नंतर कुठलेही अंतर्गत गुण स्वीकारले जाणार नाहीत.

आपणांस अशीही विनंती करण्यात येते की, मा. संचालक / प्राचार्य / विभागप्रमुख यांनी साक्षांकित केलेली छापील प्रत, प्राध्यापकांनी भरून दिलेल्या मुळ गुणयाद्या, परफार्मन्स लेजर व करेक्शन यादी या स्वतंत्रपणे अभ्यासक्रमनिहाय विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागातील संबंधित विद्याशाखेमध्ये **<u>यथावकाश</u>** सादर करावयाच्या आहेत. मुळ यादीवरील गुण व परफार्मन्स लेजर प्रिंटआऊट मध्ये गुण सारखेच असावेत. अन्यथा, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था / प्रशाळा यांची राहील.

**अंतर्गत मुल्यमापनाचे Online गुण विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास, विद्यापीठाच्या पत्र क्र.कबचौउमवि/7-अ/अंतर्गत-प्रात्यक्षिक गुणयाद्या/380/2019, दिनांक 4 फेब्रुवारी, 2019 नुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल. तसेच सदरच्या पत्रात नमुद केलेल्या मुदतीनंतर प्राप्त झालेले गुण स्विकारले जाणार नाहीत व या प्रकरणी विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधीत महाविद्यालय जबाबदार राहील.**

**तरी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.**

आपला विश्वासू,



**संचालक,**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीसाठी -**

1) यंत्रणा विश्लेषक/ विशेष कार्य अधिकारी, संगणक केंद्र, परीक्षा व मूल्यमापन मंडळ , कबचौउमवि, जळगाव
2) उपकुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळ , कबचौउमवि, जळगाव
3) सहा. कुलसचिव/कक्ष अधिकारी, **गोपनीय (पूर्वार्ध / उत्तरार्ध),** परीक्षा व मूल्यमापन मंडळ , कबचौउमवि, जळगाव
4) सहा.कुलसचिव/कक्ष अधिकारी - कला, वाणिज्य, विज्ञान व शिक्षणशास्त्र विद्याशाखा, कबचौउमवि, जळगाव
5) समन्वयक, ई-सुविधा कक्ष, कबचौउमवि, जळगाव

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/४३५६/२०२०                                                    दिनांक: २९/१२/२०२०

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील हिवाळी परीक्षा आयोजनासंदर्भातील सुचना**

**संदर्भ :-** विद्यापीठाचे पत्र क्र. कबचौउमवि/७-अ/४२६३/२०२०, दिनांक १७.१२.२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील हिवाळी परीक्षांचे आयोजन दिनांक ०५ जानेवारी, २०२१ पासून विद्यापीठाव्दारे करण्यात आले असून, सदरच्या परीक्षा हया फक्त ऑनलाईन माध्यमाव्दारे वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपात Smart Phone/ Laptop/ Desktop with web camera याद्वारे घेण्यात येणार आहेत. सदर हिवाळी परीक्षेच्या आयोजनाबाबतच्या सुचना आपणास कळविण्यात आलेल्या असून, या परीक्षेच्या आयोजनासाठी महाविद्यालय व विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे काही अधिकच्या सुचना देण्यात येत असून, त्यानुसार कार्यवाही करावी.:-

१) ज्या विद्यार्थ्यांकडे **Smart Phone/ Laptop/ Desktop with web camera** उपलब्ध करुन घेण्यास अडचणी असतील, अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे जवळचे नातेवाईक/ मित्र व इतर माध्यमातून सदर साधने उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत सुचित करण्यात यावे. सदर साधने उपलब्ध होत नसल्यासच महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षेसाठी Laptop/ संगणक संच (वेब कॅमेरासह) उपलब्ध करुन द्यावेत. जेणेकरुन या परीक्षेपासून एकही विद्यार्थी वंचित राहणार नाही, याबाबत महाविद्यालयाने दक्षता घ्यावी. याकरिता विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

२) Online परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी User Manual उपलब्ध करुन देण्यात आलेले असून, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी Mock Test व Main Exam. करिता nmu.unionline.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. आपला PRN.No. हा Login ID व जन्मतारीख DD/MM/YY या स्वरुपातील पासवर्ड म्हणून उपयोग करावा (उदा. आपली जन्मतारीख जर 08/12/1999 असेल तर आपला पासवर्ड हा 081299 असा असेल) तसेच विद्यार्थ्यांनी ज्या ठिकाणी इंटरनेट व्यवस्थित असेल अशा ठिकाणाहून परीक्षा द्यावी.

३) विद्यार्थ्यांना Online परीक्षेदरम्यान काही तांत्रिक अडचणी उदभवल्यास, त्या अडचणी विद्यार्थी परीक्षा सुरू असतांना सॉप्टवेअरवरील Chatbot मध्ये नमूद करु शकतील.

**४)** विद्यार्थ्यांसाठी Mock Test चे आयोजन करण्यात येणार असून त्याची माहीती वेळोवेळी संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरिता विद्यार्थ्यांनी वेळोवेळी संकेतस्थळाला भेट द्यावी. सुरुवातीला ५ जानेवारी २०२१ पासून ज्या परीक्षेचे आयोजन केलेले आहे. त्या विद्यार्थ्यांच्या MOCK TEST ला सुरुवात होईल. तद्नंतर टप्प्याटप्प्याने इतर वर्गांच्या MOCK TEST चे आयोजन केले जाईल. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध होईल.

५) ऑनलाईन परीक्षेदरम्यान काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास, तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला सॉफ्टवेअर मार्फत आपोआपच वाढवून दिला येईल. तसेच यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही आपोआप Save होऊन ज्या ठिकाणी परीक्षेला खंड पडला आहे, तेथून परीक्षा पुन्हा सुरू होईल.

६) विद्यापीठाचे पत्र क्र. कबचौउमवि/७-अ/२४२०/२०२०, दिनांक १७, सप्टेंबर २०२० नुसार ऑक्टोबर/ नोव्हेंबर २०२० मध्ये झालेल्या अंतिम वर्ष /सत्राच्या ऑनलाईन परीक्षेकरिता ज्या Online Exam. Co-ordinator / IT Co-ordinator यांची नियुक्ती महाविद्यालयाने केलेली होती, त्यांची नियुक्ती या परीक्षेसाठी कायम करण्यात येत असून, विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास, सदर अडचणींचे निराकरण Online Exam Co-ordinator / IT Co-ordinator यांचेशी संपर्क साधून करावे. Online Exam Co-ordinator / IT Co-ordinator यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

७) विद्यार्थ्यांशी त्वरीत संपर्क साधता यावा याकरिता महाविद्यालयांनी अभ्यासक्रमनिहाय Whatsapp/ Telegram Group तयार करावे व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती विद्यार्थ्यांना त्वरीत कळवावी.

८) संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या वेळापत्रकाप्रमाणे व प्रवेशपत्रावर असलेल्या विषयांप्रमाणे विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी.

९) विद्यार्थ्यांची ज्या विषयांची संधी संपलेली आहे, अशा विषयांकरिता समकक्ष विषयाप्रमाणे परीक्षा द्यावी. (जरी प्रवेशपत्रावर जुन्या विषयाची नोंद असली तरी).

१०) विद्यापीठ परीक्षेचे वेळापत्रक, त्यात होणारे बदल व इतर अनुषंगिक अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला वेळोवेळी भेट द्यावी.

तरी वरील बाब सर्व संबंधित विद्यार्थी, महाविद्यालयीन शिक्षक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देऊन, विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



(भ.प्र.पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र. कबचौउमवि/७-अ/४२६३/२०२० दि. १७/१२/२०२०

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयाचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक

२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा. संचालक आणि शैक्षणिक विभागाचे प्रमुख...

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील होणा-या हिवाळी परीक्षांचे आयोजन ऑनलाईन पध्दतीने करणेबाबत...**

**संदर्भ:- विद्यापीठाचे पत्र क्रमांक:-**

१.कबचौउमवि/७-अ/३०३९/२०२०, दि. ०५/११/२०२०

२.कबचौउमवि/७-अ/४०८८/२०२०, दि.०३/१२/२०२०

३.कबचौउमवि/७-अ/४२१२/२०२०, दि. १२/१२/२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये, आपणास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित विद्यार्थांच्या नियमित सत्राच्या विषयांच्या व पूर्वीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण/विषयांच्या गुणात सुधारणा करु इच्छिणा-या विद्यार्थ्यांच्या हिवाळी परीक्षांचे आयोजन वस्तुनिष्ठ बहुपर्यायी MCQ पध्दतीने दि. १० डिसेंबर, २०२० पासून ऑफ लाईन पध्दतीने करण्यात येणार असून कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव विचारात घेऊन परीक्षा पध्दतीत बदल झाल्यास, याबाबत कळविण्यात येईल. असे नमुद केलेले आहे. तसेच संदर्भीय पत्र क्र. २ नुसार दिनांक १० डिसेंबर, २०२० ते दिनांक २४ डिसेंबर, २०२० या कालावधीत सर्व पुनर्परीक्षार्थी (Backlog) विद्यार्थ्यांच्या सर्व सत्राच्या प्रात्यक्षिक व अंतर्गत परीक्षांचे आयोजन करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच संदर्भीय पत्र क्र. ३ मध्ये नमुद केल्यानुसार सदरची परीक्षा दिनांक २८.१२.२०२० पासून वस्तुनिष्ठ बहुपर्यायी M.C.Q. पॅटर्ननुसार ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येइल. असे कळविण्यात आलेले होते.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भाव लक्षात घेता विद्यार्थ्याची सुरक्षा, आरोग्याचे गांभीर्य लक्षात घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार ज्या विद्यार्थ्यांनी डिसेंबर २०२० च्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज सादर केलेला आहे, अशा विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या **परीक्षा फक्त ऑनलाईन पध्दतीने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपात** Smart Phone/Laptop/Desktop with Web camera याद्वारे घेण्यात येईल.

तसेच ऑनलाईन परीक्षेचे सॉफ्टवेअर हाताळणी व सरावाकरिता सराव चाचणीचे विद्यार्थ्यांसाठी आयोजन करणे आवश्यक असल्याने, याकरिता दिनांक २८.१२.२०२० पासून सुरु होणा-या हिवाळी परीक्षा **दिनांक ०५ जानेवारी २०२१ पासून, आयोजित करण्यात येणार असून या परीक्षांचे सुधारीत वेळापत्रके यथावकाश विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.**

संदर्भीय पत्र क्र. ३ नुसार हिवाळी परीक्षेचे आयोजन संदर्भातील सुचना कळविण्यात आलेल्या असून यातील बाब क्र. (२) वगळून इतर सर्व सुचना लागू राहतील.

सदर बाब विद्यार्थी व सर्व संबधित घटकांच्या निदर्शनास आणून देऊन परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

आपला विश्वासू

**(भ.प्र. पाटील)**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

पत्र पेटी ..: ८०, उमवि, जळगांव दूरध्वनी ..: (०२५७) २२५८४०७,२२५७३०१ ते २२५७३०५ फॅक्स ..: (०२५७) २२५८४०७
Post Box No.: ८०, Umavinagar,Jalgaon, Telephone No: (०२५७)२२५८४०७,२२५७३०१ to २२५७३०५, Fax No : (०२५७) २२५८४०७

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/४२१२/२०२०                                                  दि.१२ डिसेंबर, २०२०

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.
२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख.

**विषय** :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील परीक्षांचे आयोजन करणेबाबत.

**संदर्भ**:- (१) मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.२७ ऑक्टोबर,२०२० रोजीच्या सभेतील ठराव.
(२) विद्यापीठाचे जा.क्र. कबचौउमवि/७-अ/२४४९/२०२०, दिनांक २३.०९.२०२०.
(३) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.KBCNMU/८/Academic Calender/२९५/२०२०दि.३ नोव्हेंबर,२०२० अन्वये प्रसिध्द शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे Academic Calender.
(४) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/७-अ/ ३०३९ /२०२०,दि.०५, नोव्हेंबर २०२०
(५)विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/७-अ/३०९४/२०२०,दि.१७, नोव्हेंबर २०२० अन्वये
(६)विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/७-अ/२४५९/२०२०,दि.२३/०९/२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दि.२८.१०.२०२० रोजी झालेल्या सभेत घेतलेल्या निर्णयानुसार कळविण्यात येते की, परिपत्रक क्र.१७१/२०२०,दि.११ जून, २०२० मध्ये नमूद केल्यानुसार तसेच संदर्भांकित (३) अन्वये प्रसिध्द सन २०२०-२१ च्या शैक्षणिक दिनदर्शिकेत नमूद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नियमित सत्राच्या विषयांच्या व या पूर्वीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण/विषयांच्या गुणात सुधारणा करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हिवाळी परीक्षांचे आयोजन वस्तुनिष्ठ बहुपर्यायी MCQ पध्दतीने दि.१० डिसेंबर,२०२० पासून ऑफलाईन (Offline) पध्दतीने करण्यात येणार असल्याबाबत संदर्भांकित (५) अन्वये कळविण्यात आलेले आहे.

तसेच मार्च/एप्रिल/ मे,२०२० मधील जाहीर केलेल्या विषयांच्या गुणातील निकालात ज्या विद्यार्थ्यांना डिसेंबर २०२० च्या परीक्षेच्या वेळी सुधारणा करावयाची असेल,अशा विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करणेबाबत संदर्भांकित (५) अन्वये कळविण्यात आलेले आहे.

...२

- सर्व प्रश्न सोडविले तरी जी ४०/३०/२० याप्रमाणे उत्तरे बरोबर असतील, त्या गुणांचे ६०/४०/३० गुणांमध्ये रुपांतर केले जाईल.
- या परीक्षेकरीता Negative Marking पध्दत लागू राहणार नाही.
- दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे अतिरिक्त वेळ दिला जाईल.

(०९) वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या /बहुपर्यायी Multiple Choice Question (MCQ) परीक्षांसाठी फोटोकॉपी व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध होणार नाही.

(१०) या परीक्षेचे वेळापत्रक यथावकाश प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर बाब विद्यार्थी व सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून देऊन परीक्षा सुरळितपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(भ.प्र.पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव अग्रेषित-**

१) मा.कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) मा.प्र-कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) मा.प्र-कुलसचिव कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४)मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव-**

१) उपकुलसचिव,परीक्षा व मूल्यमापन मंडळ(विज्ञान व तंत्रज्ञान,परीक्षा गैरप्रकार चौकशी,रेकॉर्ड व पदवीप्रदान),क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) यंत्रणा विश्लेषक,संगणक केंद्र,परीक्षा व मूल्यमापन विभाग, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) प्र.सहायक कुलसचिव,(गोपनीय पूर्वार्ध) परीक्षा व मूल्यमापन मंडळ ,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४) विशेष कार्य अधिकारी (संगणक केंद्र),परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
५) परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
६) समन्वयक, एम.के.सी.एल., कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव